R/P/P/2025/II

प्रश्न-पुस्तिका क्र.
Question Booklet No.

# विषय-मराठी
# Subject-MARATHI

SET A

द्वितीय प्रश्न-पत्र (ऐच्छिक)
Paper II (Optional)
विषय कोड-17
Subject-Code-17

नाम
Name

अनुक्रमांक
Roll No.

परीक्षार्थी अपना अनुक्रमांक दिए गए खानों में लिखें।
Candidate should write his/her Roll No. in the given boxes.

मुद्रित पृष्ठों की संख्या/No. of Printed Pages : 16 — कुल प्रश्नों की संख्या/Total No. of Questions : 100

समय : 3 घण्टे प्रथम व द्वितीय प्रश्न-पत्र मिलाकर हल करने हेतु — अधिकतम पूर्णांक/Maximum Marks : 200

Time Allowed : 3 Hours to complete both Ist and IInd question paper

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. प्रत्येक प्रश्न में चार विकल्प हैं। प्रत्येक प्रश्न का केवल एक ही उत्तर सही है। उचित विकल्प चुनें और उत्तर-पत्रक (ओ.एम.आर. शीट) पर सम्बन्धित वृत्त को काले बॉल प्वॉइंट पेन से काला करें।
2. इस परीक्षा में दो प्रश्न-पत्र हैं जिसमें कुल मिलाकर 150 वस्तुनिष्ठ प्रकार के प्रश्न हैं तथा प्रत्येक प्रश्न 2 अंक का है। दोनों प्रश्न-पत्र व सभी प्रश्न अनिवार्य हैं। प्रत्येक सही उत्तर के लिए 2 अंक दिये जायेंगे। अनुत्तरित प्रश्न के लिये कोई अंक नहीं है। ऋणात्मक मूल्यांकन का प्रावधान नहीं है।

| | | |
|---|---|---|
| प्रश्न-पत्र I | सामान्य प्रश्न-पत्र | (प्रश्न संख्या 1-50) |
| प्रश्न-पत्र II | परीक्षार्थी द्वारा चयनित विषय का प्रश्न-पत्र | (प्रश्न संख्या 51-150) |

3. इस प्रश्न-पुस्तिका में पृष्ठों की संख्या आवरण पृष्ठ पर दर्शाई गई है। परीक्षार्थी को सलाह दी जाती है कि वे सुनिश्चित करें कि प्रश्न-पुस्तिका के सभी पृष्ठ ठीक से मुद्रित और जिल्दबंद हों। अन्यथा वे उसी सेट की दूसरी प्रश्न-पुस्तिका तत्काल माँग लें।
4. कृपया उत्तर-पत्रक (ओ.एम.आर. शीट) पर निर्धारित स्थानों पर ही आवश्यक प्रविष्टियाँ करें, अन्य स्थानों पर नहीं।
5. परीक्षार्थी सभी रफ़ कार्य प्रश्न-पुस्तिका के निर्धारित स्थान पर ही करें, अन्यत्र कहीं नहीं तथा उत्तर-पत्र (ओ.एम.आर. शीट) पर भी नहीं।
6. किसी प्रकार का केल्कुलेटर, लॉग टेबल व किसी प्रकार का इलेक्ट्रानिक डिवाइस आदि का प्रयोग वर्जित है।
7. जब आपको प्रश्न-पुस्तिका खोलने का निर्देश दिया जाये उसके पश्चात् ही उत्तर-पत्रक (ओ.एम.आर. शीट) में उत्तर को चिन्हित करने के लिये केवल काले बॉल प्वॉइंट पेन का प्रयोग करें।
8. परीक्षा समाप्त होने के पश्चात् ओ.एम.आर. शीट वीक्षक को सौंपने के पश्चात् ही अभ्यर्थी कक्ष छोड़ेंगे।
9. उत्तर-पत्रक (ओ.एम.आर.) पर उत्तर देने से पहले दिए गए निर्देशों का पालन करना सुनिश्चित करें।

## INSTRUCTIONS TO THE CANDIDATES

1. **Each question has four options. There is only one correct answer to each question. Choose the appropriate option and darken/blacken the corresponding circle on the Answer Sheet (OMR Sheet) with black point pen.**
2. **In this examination there are two question papers, consisting of 150 objective type questions and each question carries 2 marks. Both the question papers and all the questions are compulsory. Two (2) marks shall be awarded for each correct answer. Unanswered question will not be given any marks. There is no provisions for Negative Marking.**

| | | |
|---|---|---|
| **Paper I** | **General paper** | **(Q. No. 1-50)** |
| **Paper II** | **Question paper on the Subject opted by the examinee** | **(Q. No. 51-150)** |

3. **No. of pages consisting of this question booklet is indicated over the cover page. Candidates are advised to ensure that all the pages of Question Booklet are properly printed and binded. Otherwise they may demand the other Question Booklet of the same set.**
4. **Kindly make necessary entries on the Answer Sheet (OMR Sheet) only at the places indicated and nowhere else.**
5. **Examinee should do all rough work on the spaces meant for rough work on the pages given in the Question Booklet and nowhere else, not even on the Answer Sheet (OMR Sheet).**
6. **Use of any type of calculator, log table or any type of electronic devices etc. are not allowed.**
7. **Use only black ball point pen to mark the answers in the Answer Sheet (OMR Sheet) only after you are instructed to open the Question Booklet.**
8. **Candidates will leave the Examination Hall only after handing over the Answer Sheet (OMR Sheet) to the Invigilator at the end of the examination.**
9. **Before answering on Answer Sheet (OMR Sheet) ensure to follow the instructions given for that.**

(SPACE FOR ROUGH WORK)

रफ़ कार्य के लिए जगह

mpcareer.in

51. भाषेच्या उत्पत्तीसंबंधी लुडविग न्वार (Ludwig Noire) या भाषाशास्त्रज्ञाने कोणता सिद्धांत मांडला ?

(A) श्रमपरिहार सिद्धांत

(B) प्रेममूलक सिद्धांत

(C) भावनाभिव्यक्ती सिद्धांत

(D) डिंग डाँग सिद्धांत

52. 'तिने खूप परिश्रम घेतले, परंतु तिला नाटकात काम करता आले नाही' हे कोणत्या प्रकारचे वाक्य आहे ?

(A) समुच्चयबोधक (B) न्यूनत्वबोधक

(C) विकल्पबोधक (D) परिणामबोधक

53. नासिक्य उच्चारांचे बाहुल्य आणि शब्दांतीच्या 'अ' कारादी स्वरांचे पूर्ण उच्चार, हे कोणत्या बोलीचे ठळक विशेष आहेत ?

(A) डांगी (B) वऱ्हाडी

(C) चंदगडी (D) कोकणी

54. (अ) गृहित, पर्यात्प, महत्त्व

(ब) प्रावीण्य, निःस्पृह, तथापि

(क) दीपा, रूप, सिद्ध

(ड) विविक्षित, मतितार्थ, परीव्यय

वरीलपैकी शुद्ध शब्दांचा गट ओळखा :

(A) फक्त (अ), (ब)

(B) फक्त (ब)

(C) फक्त (ब), (क)

(D) फक्त (ब), (क), (ड)

55. शब्दाचे उपान्त्य अक्षर 'ई' किंवा 'ऊ' असेल तर सामान्यरूपात 'ई' आणि 'ऊ' च्या जागी काय येईल ?

(A) 'अ' आणि 'व'

(B) 'य' आणि 'अ'

(C) 'इ' आणि 'उ'

(D) 'य' आणि 'व'

56. अपसारण चिन्हाचा वापर केंव्हा करतात ?

(A) पूर्ण अर्थाच्या वाक्यानंतर शेवटी देतात.

(B) दोन शब्द जोडताना दोन्ही शब्दांच्या मध्ये देतात.

(C) वाक्य मध्येच अर्धवट सोडायचे असेल तर देतात.

(D) दोन वाक्ये जोडताना दोन्ही वाक्यांच्या मध्ये देतात.

57. पुढीलपैकी कोणते विधान चूक आहे ?

(अ) भाषा ही सामाजिक परिसरामध्येच विकसित होत असते.

(ब) व्यक्ती ही भाषेद्वाराच समाजाशी संवाद साधते.

(क) भाषेतील शब्दांना व शब्दांच्या रचनांना विशिष्ट व्यक्तीच मान्यता देते.

पर्यायी उत्तरे :

(A) फक्त (अ) चूक

(B) फक्त (अ) व (क) चूक

(C) फक्त (ब) व (क) चूक

(D) फक्त (क) चूक

58. पुढील विधाने पहा.

(अ) मानवी भाषेमध्ये चिन्हे व चिन्हित संदेश यातील नाते एकास एक असते.

(ब) निर्मितीशीलता हा भाषेचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म आहे.

(क) भाषिक वर्तन अथवा बोलणे हे व्यक्ति सापेक्ष बदलत नाही.

वरीलपैकी अयोग्य विधाने असणारा पर्याय निवडा.

(A) फक्त (अ), (ब)

(B) फक्त (ब), (क)

(C) फक्त (अ), (क)

(D) (अ), (ब), (क) सर्व

59. बोलीच्या अभ्यासाचे परिक्षेत्र म्हणून कोणती संकल्पना विकसित झाली आहे ?

(A) बोली नकाशा

(B) बोली भूगोल

(C) घटक भाषांश

(D) बोली क्षेत्र

60. पुढील वाक्ये चूक की बरोबर ते सांगा.

(अ) वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात त्यांना 'कारकार्थ' असे म्हणतात.

(ब) क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी जे संबंध असतात त्यांना 'उपपदार्थ' असे म्हणतात.

(A) (अ) चूक (ब) बरोबर

(B) (अ) बरोबर (ब) चूक

(C) (अ) व (ब) बरोबर

(D) (अ) व (ब) चूक



mpcareer.in

61. ''संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल-विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती'' ही संस्कृतीची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) इरावती कर्वे (B) साने गुरुजी

(C) दुर्गा भागवत (D) अरुणा ढेरे

62. ''लळित म्हणजे सोंग आणणे. असे स्वरूप आज ग्रामीण भागात काही ठिकाणी पाहावयास मिळते. सण, उत्सवाच्या शेवटच्या दिवशी 'लळित' करण्याची प्रथा महाराष्ट्रातील काही भागात पाहावयास मिळते. सोंग आणून केलेले कीर्तन म्हणजे लळित असा अर्थ शब्दाकोशात पाहवयास मिळतो. त्यावरून लळिताचा आणि कीर्तनाचा संबंध स्पष्ट होतो'' हे विधान कोणाचे आहे ?

(A) प्रभाकर मांडे

(B) मधुकर वाकोडे

(C) अनिल सहस्रबुद्धे

(D) शरद व्यवहारे

63. ''फडके-खांडेकर-माडखोलकरांच्या काळातच ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला जाणीवपूर्वक प्रारंभ झाला. परंतु ग्रामीण जीवनातील धग अस्सलपणे त्या काळात किती प्रकट झाली असा प्रश्नच आहे. ठोकळ, दिघे यांना ग्रामीण जीवनाचा अस्सल होता याच्या खाणाखुणा त्यांच्या साहित्यात दिसतात. पण त्या काळात ग्रामीण साहित्य वाचणारा वर्ग प्राय: नागर, शहरी होता. म्हणून या ग्रामीण लेखकांना समकालीन अभिरुचीशी तडजोड करावी लागली.'' असे मत कोणी व्यक्त केले आहे ?

(A) डॉ. नागनाथ कोतापल्ले

(B) डॉ. प्रभाकर मांडे

(C) डॉ. मनोहर जाधव

(D) डॉ. वासुदेव मुलाटे

64. मराठी नियतकालिकांच्या युगाला बालशास्त्री जांभेकरांनी सुरू केलेल्या 'दर्पण' ने प्रारंभ झाला. कोणत्या वर्षी इंग्रजी व मराठीतून जांभेकरांनी 'दर्पण' सुरू करून अर्वाचीन मराठी साहित्याची, मराठीतील अर्वाचीन गद्याची मूहूर्तमेढ रोवली ?

(A) १८५० (B) १८२०

(C) १८३२ (D) १८४८

65. ''आद्य निबंधकार' आणि मराठी गद्यशैलीचे प्रवर्तक असा ज्यांचा यथार्थपणे उल्लेख करता येईल असे लेखक कोण ?

(A) शि.म. परांजपे (B) लोकहितवादी

(C) गो.ग. आगरकर (D) लोकमान्य टिळक

66. १ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेनुसार मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. शासनव्यवहारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी महाराष्ट्राने स्वतंत्र भाषा-संचालनालय स्थापन करून कोणता मराठी कोश सिद्ध केला ?

(A) विश्वकोश (B) पदनामकोश

(C) शब्दकोश (D) ज्ञानकोश

67. ''सत्यशोधक समाजातील कार्यकर्त्यांनी आपले विचार लोकांपर्यंत जावे म्हणून तमाशाच्या ढंगाचा सत्यशोधक जलसा उभा केला. त्यात मंनोरंजानापेक्षा प्रबोधनाला विशेष महत्त्व दिले बहुजन समाजातील कलाकारांनी बहुजनांच्या प्रबोधनासाठी सादर केलेली कलाकृती म्हणजे जलसा म्हणता येईल'' ही व्याख्या कोणी केली आहे ?

(A) म. जोतीराव फुले

(B) मोतीराम वानखडे

(C) डॉ. संभाजी खराट

(D) डॉ. श्रीराम गुंदेकर

68. कोणी 'संयुक्त महाराष्ट्र मंडल' स्थापन करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला नवसंजीवनी देण्याचे कार्य केले ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(B) डॉ. पंजाबराव देशमुख

(C) साने गुरुजी

(D) सेनापती बापट

69. कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी, रिपब्लिकन पक्ष इत्यादींनी एकत्र येऊन कोणत्या दिवशी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली ?

(A) ९ मे १९६०

(B) ६ फेब्रुवारी १९५६

(C) २६ जानेवारी १९५०

(D) १५ नोव्हेंबर १९५५

70. राम गणेश गडकरी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर या नाटककारांच्या समकालीन कोणत्या नाटककाराने सत्यशोधकी जाणिवांची आणि आशयाची नाटके लिहिली ?

(A) गो.ब. देवल

(B) मुकुंदराव पाटील

(C) कृष्णजी प्रभाकर खाडीलकर

(D) वि.वि. शिखाडकर

mpcareer.in

71. 'भाषांतर करणे' ही रोमन लोकांनी शोधलेली कला आहे, हे विधान कोणी केले ?

(A) हॉरेस

(B) सिसेरो

(C) एरिक याकोबसन

(D) अब्राहम काऊले

72. भाषांतराचे शब्दानुवाद (Metaphrase), अर्थानुवाद (Paraphrase) आणि आशयानुवाद/अनुकृती (Imitation) हे तीन प्रकार कोणी सांगितले ?

(A) जॉन ड्रायडन

(B) एरिक याकोबसन

(C) पी.बी. शेले

(D) मॅक्समुल्लर

73. दिलिप चित्रे यांनी कवितेच्या भाषांतरासाठी कोणती संज्ञा योजिली आहे ?

(A) रूपांतर (B) स्थलांतर

(C) अपभ्रंश (D) प्राकृत

74. एका माध्यमातील साहित्यकृतीला दुसऱ्या माध्यमाच्या मुशीत नव्याने ओतने आणि नवाच घाट तयार करण्याच्या प्रक्रियेस काय म्हणतात ?

(A) भावानुवाद (B) मुक्तानुवाद

(C) अनुकृती (D) रूपांतर

75. 'Inspector General' (इन्सपेक्टर जनरल) या मूळ रशियन नाटकाच्या इंग्रजी भाषांतराचे रूपांतर म्हणून पु.ल. देशपांडे यांचे कोणते नाटक ओळखले जाते ?

(A) अंमलदार

(B) तुझे आहे तुजपाशी

(C) ती फुलराणी

(D) एक झुंज वाऱ्याशी

76. वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र कोणी मांडले ?

(A) हेरॉल्ड ब्लूम

(B) सिग्मंड फ्रॉईड

(C) एरिक याकोबसन

(D) नबी इस्ताईफ

77. खालीलपैकी कोणत्या प्रकारातील अभंगांतून संत तुकारामांनी शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या उपक्रमांबाबत भाष्य केले ?

(A) आत्मपर अभंग

(B) पाईकोचे अभंग

(C) सामाजिक अभंग

(D) उपदेशपर अभंग

78. विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या कादंबरीवर कोणत्या राजवटीचा परिणाम दिसून येतो ?

(A) इस्लामी राजवट

(B) मराठा राजवट

(C) इंग्रजी राजवट

(D) निजामी राजवट

79. बुद्ध, फुले, चार्वाक, आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा आधार स्विकारलेली रंगभूमी कोणती ?

(A) अभिजात रंगभूमी

(B) लोक रंगभूमी

(C) दलित रंगभूमी

(D) हौशी रंगभूमी

80. सन् १८६३ मध्ये 'भारतीय साहित्य' या संज्ञेचा वापर कोणी केला ?

(A) डॉ. सिसिरकुमार दास

(B) फ्रेडरिक श्लेगेल

(C) मैथ्यू अर्नोल्ड

(D) डॉ. राधाकृष्णन

81. अशोकाच्या शिलालेखात 'लोक' ही संज्ञा कोणत्या अर्थाने वापरण्यात आली आहे ?

(A) समस्त प्रज्ञा (B) विशिष्ट प्रज्ञा

(C) समस्त (D) विशिष्ट वंश

82. लोकसंस्कृतीचा उपासक 'वासुदेव' उदर-निर्वाहासाठी भिक्षा मागताना म्हणत असलेल्या गाण्याचा विषय कोणता ?

(A) श्रीकृष्ण (B) श्रीराम

(C) दत्तात्रय (D) खंडोबा

83. 'भराडा', 'गोंधळ', 'जागरण' इत्यादी लोककलाप्रकार नाटकाच्या कोणत्या प्रकारात मोडतात ?

(A) अभिजात नाट्य (B) ग्रामीण नाट्य

(C) विधी नाट्य (D) दशावतार

84. लोकसाहित्य अभ्यासाची ऐतिहासिक-भौगोलिक पद्धती १८८९ च्या सुमारास कोणी सुरू केली ?

(A) थिओडोर बेनफे

(B) मॅक्समुल्लर

(C) ज्युलिअस क्रोन

(D) कार्ल जी. युंग

85. जुन्या धर्मकल्पनांवर प्रश्नचिन्ह ठेवून, दारिद्रय, अस्पृश्यता, जातवर्ण व्यवस्थेला नकार देणारा वाङ्मयीन प्रवाह कोणता ?

(A) दलित साहित्य

(B) मुस्लीम मराठी साहित्य

(C) आदिवासी साहित्य

(D) स्त्रीवादी साहित्य

86. खालीलपैकी कोणता कथासंग्रह शंकरराव खरात यांचा नाही ?

(A) तडीपार (B) टिटवीचा फेरा

(C) खुळंवाडी (D) दौंडी

87. खालीलपैकी कोणती आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी नाही ?

(A) झोंबी (B) नांगरणी

(C) नटरंग (D) घरभिंती

88. भास्कर चंदनशिव यांचे चार कथासंग्रह असलेला योग्य पर्याय निवडा.

(A) जांभळढव्ह, अंगारमाती, कागुद, उचल

(B) आबी, खुळंवाडी, मरणकळा, नवी वारूळे

(C) जांभळढव्ह, अंगारमाती, मरणकळा, नवी वारूळे

(D) यापैकी नाही

89. ग.ल. ठोकळ यांनी प्रसिद्ध केलेला 1933 साली प्रसिद्ध झालेला प्रातिनिधिक कवितासंग्रह कोणता ?

(A) मीठभाकर (B) सुगी

(C) रानजाई (D) गुराख्यांचे गाणे

90. 'जिणं आमुचं' या आत्मकथनाच्या लेखिका कोण ?

(A) उर्मिला पवार (B) विमला मोरे

(C) जनाबाई गिऱ्हे (D) बेबी कांबळे

91. वाङ्मयेतिहास लेखनाचा महत्त्वपूर्ण निकष कोणता ?

(A) वस्तुनिष्ठता (B) मानवी हस्तक्षेप

(C) रूढीप्रियता (D) मतभिन्नता

92. वाङ्मयेतिहास लेखनाच्या संदर्भात 'वाङ्मयकृतीचा इतिहास संभवतच नाही' असे मत कोणी मांडले ?

(A) थॉमस वॉर्टन (B) टी.एस. इलियट

(C) विल्यम कॅरे (D) वि.का. राजवाडे

mpcareer.in

93. वाङ्मयेतिहास कालखंडामध्ये इ.स. १३४७ मध्ये गुलबर्गा येथे मुस्लिम सत्तेची स्थापना कोणी केली ?

(A) वास्को-द-गामा

(B) हसन गंगू बहमनी

(C) अल्लाउद्दीन खिलजी

(D) मलिक काफूर

94. शिवकालाविषयी 'अत्यंत उत्पादक काळ' अशी नोंद कोणत्या ग्रंथात आली आहे ?

(A) साहित्याचे मानदंड

(B) वाङ्मयीन महात्म्यता

(C) साहित्य सारस्वत

(D) महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण

95. पंडिता रमाबाई रानडे यांची ख्रिस्त धर्माचा प्रसार करणारी संस्था कोणती ?

(A) विवाह संस्था (B) आनंदवन

(C) शारदासदन (D) सेवासदन

96. वाङ्मय इतिहास लेखनातील आशय-अभिव्यक्ती संदर्भातील मौलिकता म्हणजे काय ?

(A) भावनात्मकता (B) प्रयोगशीलता

(C) प्रसंगावधान (D) कलात्मकता

97. मुंबई येथे स्थापन झालेल्या 'थिऑसॉफिकल सोसायटीचे' प्रमुख ध्येय कोणते ?

(A) जातिभेद (B) सांस्कृतिक छेद

(C) विश्वबंधुत्व (D) फुटीरतावाद

98. 'वायुपुराण' या ग्रंथात महाराष्ट्र नामाभिधानाविषयी कोणता उल्लेख आढळतो ?

(A) नवराष्ट्र (B) दंडकारण्य

(C) नरराष्ट्र (D) महारट्ट

99. कवी भा.रा. तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे' या कवितेचा रचनाप्रकार कोणता ?

(A) विलापिका (B) विडंबन

(C) जानपदगीत (D) सांगीतिका

100. ग्रामीण राजकारणातील महिलांच्या कोंडीचे चित्रण करणारे 'आमदार सौभाग्यवती' या नाटकाचे लेखक कोण ?

(A) अरुण साधू

(B) रा.रं. बोराडे

(C) व्यंकटेश माडगुळकर

(D) केशव मेश्राम

mpcareer.in

101. दलित साहित्य चळवळीला वाहिलेले पहिले अनियतकालीक कोणते ?

(A) जातक (B) विद्रोह

(C) संसद (D) अस्तित्त्व

102. संयुक्त राष्ट्रसंघाने खालीलपैकी कोणते वर्ष जागतिक महिला वर्ष म्हणून जाहिर केले ?

(A) १९७० (B) १९७५

(C) १९७६ (D) १९८५

103. विषम समाजव्यवस्थेविरुद्ध प्रखर विद्रोह प्रकट करणारा 'जेव्हा मी जात चोरली होती' हा कथासंग्रह कोणी लिहिला ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(B) शंकरराव खरात

(C) बाबुराव बागूल

(D) योगिराज वाघमारे

104. ग्रामीण साहित्य चळवळीचे मुख्य प्रवर्तक कोणास मानले जाते ?

(A) डॉ. आनंद यादव

(B) व्यंकटेश माडगूळकर

(C) श्री म. माटे

(D) रा.र. बोराडे

105. 'आदिवासी कविता' हा गोंडीभाषेतील कवितासंग्रह १९७५ मध्ये आणि १९९० मध्ये 'उलगुलान' हा कवितासंग्रह कोणी प्रसिद्ध केला ?

(A) विनायक तुमराम

(B) कुसुम आलम

(C) उषाकिरण आत्राम

(D) केशव मेश्राम

106. महाराष्ट्रातील भाषाशुद्धीच्या चळवलीशी कोणाचे नाव कायमचे निगडीत आहे ?

(A) आचार्य अत्रे

(B) स्वातंत्र्यवीर सावरकर

(C) गो.ग. आगरकर

(D) त्र्यंवक पटवर्धन

107. स्त्रीवादाची मुलभूत पायाभरणी करणारे 'दि सेकंड सेक्स' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) व्हर्जिनिया वुल्फ (B) सिमॉन दि बोव्हा

(C) केट मिलेट (D) यापैकी नाही

108. दलित साहित्य चळवळीतील महत्त्वाचे योगदान देणारे अस्मिता अंकाचे 'अस्मितादर्श' असे नामकरण कोणत्या वर्षी करण्यात आले ?

(A) १९५८ (B) १९४८

(C) १९८० (D) १९६८

mpcareer.in

109. बैलांना औताला किंवा गाडीला गुंतवताना त्यांच्या मानेवर ठेवतात ती लांब दांडी त्याला मराठी (शेतकरी) ग्रामीण साहित्यात कोणता शब्द वापरला जातो ?

(A) येलं (B) जू किंवा दुस्सेर

(C) कोडकं (D) तन्या

110. दलितांच्या पहिल्या साहित्य संमेलनाची दखल कोणत्या एका वृत्तपत्राने घेतली ?

(A) दै. लोकसत्ता (B) नवशक्ती

(C) दै. मराठा (D) सकाळ

111. भारतीय स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या आद्य लेखिका कोण आहेत ?

(A) तारा भवाळकर (B) ताराबाई शिंदे

(C) अश्विनी धोंगडे (D) गौरी देशपांडे

112. 'मुस्लिम साहित्य' हा शब्दप्रयोग प्रथम कोणत्या साहित्यिकाने केला ?

(A) सय्यद अमीन (B) यू.म. पठाण

(C) फ.म. शहाजिंदे (D) राजन खान

113. 'पद्मपुराण' ही रचना कोणत्या जैन साहित्यिकाने केली ?

(A) गंगादास (B) ब्रह्मगुणदास

(C) वीरदास (D) आचार्य गुणकीर्ती

114. पहिले मराठी विज्ञान साहित्य संमेलन कुठे व कोणत्या साली झाले ?

(A) मुंबई, १९७५ (B) गोवा, १९८०

(C) नागपूर, १९८५ (D) पुणे, १९९०

115. 'ऊलगुलान' हा प्रसिद्ध कवितासंग्रह कोणाचा आहे ?

(A) वामन निंबाळकर (B) वाहरू सोनवणे

(C) विनायक तुमराम (D) भुजंग मेश्राम

116. मार्क्सवादी दृष्टिकोनातून साहित्याचे समीक्षण करणारे पहिले पुस्तक कोणी लिहिले ?

(A) दि.के. बेडेकर

(B) शरच्चंद्र मुक्तिबोध

(C) दिगंबर पाध्ये

(D) लालजी पेंडसे

117. मराठीत पहिल्यांदाच बालांसाठी लेखन करणाऱ्या स.का. छत्रे यांनी बार्क्वेसच्या 'द चिल्ड्रेन्स फ्रेन्ड' या पुस्तकाचा मराठीत कोणत्या शीर्षकाने अनुवाद केला ?

(A) बाळमित्र (B) चांदोबा

(C) गुजगोष्टी (D) किशोर

118. "इंग्रजी कवींशी समकालीन होऊन लिहिणारे मर्ढेकर हे पहिले कवी आहेत", असे कोणी म्हटले आहे ?

(A) गो.वि. करंदीकर (B) पु.शि. रेगे

(C) दिलीप चित्रे (D) म.वा. धोंड

119. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या जळत्या दुःखाला आपल्या काव्यात पहिल्यांदा स्थान कोणी दिले ?

(A) महात्मा जोतीराव फुले

(B) राजर्षी शाहू महाराज

(C) उषाकिरण आत्राम

(D) केशव मेश्राम

120. "व्यक्तीच्या मनातील भावसत्य कलात्मक रीतीने प्रकट करणे हे साहित्याच्या भाषेचे प्रयोजन आहे, शास्त्र-विज्ञानाच्या क्षेत्रातील वस्तुसत्याहून हे भावसत्य भिन्न असते." या विधानाबाबत योग्य पर्याय निवडा.

(A) संपूर्ण विधान चूक आहे

(B) संपूर्ण विधान बरोबर आहे

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे

(D) विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे

121. पंजाबमध्ये कोणता पंथ जयकृष्णी पंथ या नावाने ओळखला जातो ?

(A) नाथ संप्रदाय

(B) वारकरी संप्रदाय

(C) सूफी संप्रदाय

(D) महानुभाव संप्रदाय

122. 'शिवरायांचे आठवावे रूप ।

शिवरायांचा आठवावा प्रताप ।।'

या काव्यपंक्ती कोणाच्या ?

(A) संत ज्ञानेश्वर (B) संत तुकाराम

(C) समर्थ रामदास (D) संत एकनाथ

123. शाहिरी काव्याला 'कीर्तिकाव्य' असे कोणी संबोधिले आहे ?

(A) वि.पां. दांडेकर

(B) वि.का. राजवाडे

(C) शं.गो. तुळपुळे

(D) म.ना. सहस्रबुद्धे

124. 'अलंकारसर्वस्व' या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(A) रुद्रट (B) रुय्यक

(C) भामह (D) दण्डी

125. नाथ संप्रदायाचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न कोणी केला ?

(A) संत नामदेव

(B) संत एकनाथ

(C) गोरक्षनाथ

(D) मन्मथ स्वामी

126. रचना काळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर कोणती आहे ?

(A) महिकावतीची उर्फ माहीमची बखर

(B) राक्षेसतागडीची बखर

(C) भाऊसाहेबांची बखर

(D) शेडगावकर बखर

127. मम्मटाने कोणत्या प्रयोजनाला सर्वश्रेष्ठ प्रयोजन म्हटले आहे ?

(A) अशुभ निवारण

(B) व्यवहार ज्ञान

(C) आनंद

(D) पलायनवाद

128. 'काव्यम् ग्राह्यंम् अलंकारात' हे काव्याचे लक्षण कोणी सांगितले आहे ?

(A) भरतमुनी (B) वामन

(C) भामह (D) विश्वनाथ

129. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा प्रतिभा' ही प्रतिभेची व्याख्या खालीलपैकी कोणी केली ?

(A) अभिनवगुप्त (B) हेमचंद्र

(C) भरतमुनी (D) वामन

130. संकेताने म्हणजे च अभिधेने व्यक्त होणारा शब्दाचा अर्थ कोणता ?

(A) वाच्यार्थ (B) लक्ष्यार्थ

(C) व्यंग्यार्थ (D) कारकार्थ

mpcareer.in

131. ''कांदबरीची रचना संघराज्याच्या रचनेसारखी असते आणि दीर्घकयेची रचना एकात्म राज्याच्या घटने सारखी असते'' असे कोणी म्हटले आहे ?

(A) शंकरराव खरात

(B) अरविंद गोखले

(C) भालचंद्र नेमाडे

(D) गंगाधर गाडगीळ

132. ''साहित्यसमीक्षेलाही ही वाङ्मयप्रकार व्यवस्था काही प्रमाणात उपयुक्त ठरते. प्रत्येक वाङ्मयप्रकाराची काही ठरीव लक्षणे साहित्यशास्त्र मानते, परंतु ही नित्य मानणे आणि त्या निकषावरच कोणत्याही वाङ्मयकृतीची समीक्षा करू पाहणे गैर'' असे कोणी म्हटले आहे ?

(A) म.वा. धोंड

(B) मिलिंद मालशे

(C) गो.वि. करंदीकर

(D) गो.म. कुलकर्णी

133. ''तीन ओळीची कविता'' हा कवितासंग्रह कोणत्या कवीचा आहे ?

(A) सतीश कळसेकर

(B) श्रीधर शनवारे

(C) मंगेश पाडगावकर

(D) शंकर वैद्य

134. 'घोटभर पाणी' या महत्त्वपूर्ण एकांकिका लेखनामुळे कोणते नाटयलेखक लक्षवेधी ठरले ?

(A) शिल्पा मुंब्रसकर

(B) दत्ता भगत

(C) प्रेमानंद गज्वी

(D) रत्नाकर मतकरी

135. 'महाकाव्य : स्वरूप आणि समीक्षा' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) द.भि. कुलकर्णी

(B) रा.ग. जाधव

(C) म.वा. धोंड

(D) के.ना. वाटवे

mpcareer.in

136. 'हिमालयाची सावली' या नाटकाचे लेखक कोण ?

(A) वि.वा. शिरवाडकर

(B) पु.ल. देशपांडे

(C) मो.ग. रांगणेकर

(D) बसंत कानेटकर

137. 'साता समुद्रापलीकडे' या प्रवासवर्णनाचे लेखक कोण ?

(A) पु.ल. देशपांडे

(B) रा.भि. जोशी

(C) गंगाधर गाडगीळ

(D) दि.बा. मोकाशी

138. 'अपभ्रंश भाषेतील षट्पदीपासून अभंग आणि ओवी हे छंद मराठीत आले' असे कोणी म्हटले आहे ?

(A) ह.द. वेलणकर

(B) ना.ग. जोशी

(C) श्री. रं. कुलकर्णी

(D) गं.ना. मोरजे

139. 'कवी गिरीश' यांनी लिहिलेले 'स्वप्नभूमि' हे चरित्र कोणाचे आहे ?

(A) अनिल

(B) यशवंत

(C) माधव जुलियन

(D) भा.रा. तांबे

140. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या कालात कोणत्या विचारसरणीवर स्वायत्ततावादी सिद्धांतांचा प्रभाव होता ?

(A) वास्तववादी

(B) स्वच्छंदतावादी

(C) मार्क्सवादी

(D) रूपवादी

141. काय खावें आतां कोणीकडे जावें

गांवांत राहावें कोण्या बळें ?

प्रस्तुत अभंग खालीलपैकी कोणत्या संताचा आहे ?

(A) संत ज्ञानेश्वर

(B) संत तुकाराम

(C) समर्थ रामदास

(D) चोखामेळा

142. 'ज्ञानाचा सागर सखा माझा ज्ञानेश्वर' हा संतस्तुतीपर अभंग कोणाचा आहे ?

(A) संत मुक्ताबाई

(B) संत कान्होपात्रा

(C) संत सोयराबाई

(D) संत जनाबाई

143. वारियाने कुंडल हाले ।

डोळे मोडीत राधा चाले ।।

या गौळणीचा कर्ता कोण ?

(A) संत ज्ञानेश्वर

(B) संत तुकाराम

(C) संत एकनाथ

(D) संत नामदेव

144. 'विविधज्ञानविस्तार' मासिकात 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या सदराखाली कोणता ग्रंथ प्रसिद्ध झाला ?

(A) आज्ञापत्र

(B) पेशव्यांची बखर

(C) विवाहसंस्था

(D) मराठ्यांची बखर



mpcareer.in

145. 'नथीतील मोती' हा लेख कोणत्या आत्मचरित्रातील आहे ?

(A) आयदान

(B) जिणं आमुचं

(C) स्मृतिचित्रें

(D) सांगते ऐका

146. 'सावजी' ही व्यक्तिरेखा कोणत्या कादंबरीतील आहे ?

(A) माणूस

(B) हिंदु : जगण्याची समृद्ध अडगळ

(C) बनगरवाडी

(D) आनंद ओवरी

147. 'तिरडीवर नोटांची बंडलं पसरून त्यावर झोपून बेवारस जाणार अखेर हे' हा संवाद कोणत्या नाटकातील आहे ?

(A) शोभायात्रा

(B) कोण म्हणतंय टक्का दिला

(C) गिधाडे

(D) अश्रूंची झाली फुले

148. धरणगावकडून प्रॉपर्टीचा चौथा हिस्सा मिळण्याची शक्यता कोणाला होती ?

(A) झेंडी

(B) चिंधूआत्या

(C) खंडेराव

(D) सुकलाल

149. मानोहर तल्हार यांच्या 'माणूस' या कादंबरीला कोणत्या लेखकाची प्रस्तावना आहे ?

(A) आनंद यादव

(B) या.वा. वडस्कर

(C) ग.ल. ठोकळ

(D) र.वा. दिघे

150. 'कोण म्हणतंय टक्का दिला' या नाटकाचा कथानक विषय कोणता आहे ?

(A) आरक्षण (B) निवडणूक

(C) कर्जमाफी (D) जाहीरनामा

(SPACE FOR ROUGH WORK)

रफ़ कार्य के लिए जगह

mpcareer.in

(SPACE FOR ROUGH WORK)

रफ़ कार्य के लिए जगह

mpcareer.in